**ज्ञान प्रबोधिनी : संस्कृत-संस्कृति-संशोधिका**

**५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

**संस्कृतेन अभिनन्दत, अभिवादयत ।**
WISH/GREET IN SANSKRIT

सुप्रभातम् । Good morning.
सुदिनम् । Good day.
सुरात्रिः । Good night.
सुषुप्तम् | Happy sleep.
स्वस्ति । पुनर्दर्शनाय ।
Good bye. See you again.
श्रीरस्तु/जयोऽस्तु ।
Wish you glory/victory.
सिद्धिरस्तु | Wish you success.
सुभाग्यम् । Best Luck.
प्रवर्षतु नववर्षं सुखमारोग्यमृद्धताम् ।
Happiness, health and wealth,
May the New Year shower!
अस्तु दीपावली तुष्टये पुष्टये ।
May Diwali bring you
happiness and prosperity!
भवतु वो जन्मदिनं प्रीतये । Happy birthday!
सुखायास्तु शुभायास्तु दाम्पत्यं परमाय वाम् ।
Wish you a very happy and
prosperous married life!
शुभास्ते सन्तु पन्थानः । Happy journey !
सुखमुत्पतनं सुखमवतरणम् ।
Happy flight, Happy landing !
सुस्निग्धम् अभिनन्दनम् ।
Very hearty congratulations.
उपकृता स्मः । Thank you.
यत् किंचित् एतत् । No mention.
सदा स्वागतम् । You are welcome.

**संस्कृताची देणगी**
**संस्कृताने भारताला काय दिले?**

१. जगातल्या प्राचीनतम राष्ट्रांत मानाचे स्थान दिले.
२. भारतीय भाषांना अपरंपार, सर्वांगीण शब्दसामर्थ्य दिले.
३. व्यास, वाल्मीकी, कालिदास यांच्यासारखे साहित्यकार दिले, ज्यांनी शतकानुशतके भारतीय मनाचे आणि भाषांचे पोषण केले, जे अजून करीत आहेत.
४. वेद, महाभारत, रामायण, पुराणे, बौद्ध आणि जैन ह्या परंपरांतले ग्रंथ यांच्या द्वारा एकसंध संस्कृती घडविली.
५. भारताला एक राष्ट्र म्हणून अस्मिता दिली. भारताच्या सर्व बहुभाषिक प्रदेशांना एक चिरंतन सूत्रात माळले.
६. श्रेष्ठ प्रतीचे ललित आणि शास्त्रीय वाङ्मय दिले. संगीत आणि संगीताचा स्वतंत्र विचार दिला. त्यांच्या द्वारा प्रादेशिक भाषांतील अशा वाङ्मयाला प्रेरणा दिली.
७. ललित कला, धर्म, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, गणित, वास्तव शास्त्रे, रालनीती, कामशास्त्र, योग इत्यादी शास्त्रांत मूलगामी विचार मांडणारे थोर ग्रंथकार दिले.

कृतज्ञता सुसंस्कृततेची कसोटी आहे.
आपण संस्कृतासाठी काय करणार?

**संस्कृताने जगाला काय दिले?**

१. शतकानुशतके नवनवीन विचारधन दिले. अजून ते देत आहे.

क्षम्यताम् । Excuse me.
प्रसीदत । Please.
खिन्नाः स्मः । Sorry.
प्रीताः स्मः | Happy.
प्रत्याशंसामहे शं वः ।
We reciprocate your good wishes.
दिनमिदं समुदेतु पुनः पुनः ।
Many happy returns of the day !

२. सर्व वास्तव शास्त्रांचा पाया असे गणित दिले शून्य, अनंत आणि दशमान गणनपद्धती या अभिनव आणि क्रांतिकारक संकल्पना दिल्या.
३. अर्ध्या जगावर प्रेमाने राज्य करणारा बौद्ध धर्म दिला.
४. भारताच्या आग्नेयेकडील दूरदूरच्या देशांना एकात्म असे सांस्कृतिक, पौराणिक अधिष्ठान दिले.
५. पाणिनीसारखा अद्वितीय वैयाकरण दिला. आधुनिक काळात उपयोगार्ह होणारा पायाशुद्ध भाषाशास्त्राचा विचार दिला.
६. मानवी संस्कृतीचे प्राचीनतम, विश्वासार्ह आणि अक्षय उद्गार असे वेद वाङ्मय दिले.
७. युरोपच्या पश्चिम किनाऱ्यापासून आणि त्याच्या उत्तरतम देशापर्यंतच्या आणि भारताच्या पूर्व सीमेपर्यंतच्या प्रदेशावर बोलल्या जाणाऱ्या भाषा एकाच उगमातून निघालेल्या आहेत. हा एकोणिसाव्या शतकातला सर्वात क्रांतिकारक शोध (मॅक्स म्यूलर) दिला.
८. युरोप आणि मध्यपूर्वेचे देश यांना नीतिकथावाङ्मय आणि आयुर्वेदशास्त्र देऊन अशा लोकोपयोगी वाङ्मयाच्या रचनेला प्रेरणा दिली, प्रभावित केले.

*म्हणून जगाच्या लेखी भारत ही संस्कृतभूमी आहे.*
*स्वार्थासाठी तरी संस्कृत जपू या !*